**सत्र खटला क्र. ५०/२०२१**
**सरकार वि. दामोदर**
**नि.क्र. ५३**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ४ यांची जबानी.</u>**

मी शपथेवर निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| नांव | — डॉ. रवीदास पुरुषोत्तम पाटील |
| वय | — ६६ वर्ष |
| कामधदां | — सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी |
| राहणार | — जठारपेठ, अकोला, ता.जि. अकोला. |

---------------------------------------------------------------------------------

**<u>सरकार पक्षातर्फे सरतपास श्री. एम.बी.मानकर, सहाय्यक सरकारी वकील यांचे मार्फत—</u>**

**१.** दिनांक ०८.०५.२०१९ रोजी मी प्राथमिक आरोग्य केंद्र, पातुर येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी पोलीसांनी रिक्वीझीशन लेटरसह चार जख्मींना तपासणीकरिता आणले होते. मला आता ते रिक्वीझीशन लेटरची कार्बन प्रत दाखविली. त्यावर माझी पोहोच म्हणून सही आहे. ही तीच आहे. त्याला **निशाणी क्रमांक ५४** देण्यात येत आहे. मी त्या चारही रुग्णांना तपासले होते.

**२.** मी रुग्ण विजय सदाशिव महाले याला तपासले होते. तपासणीमध्ये त्याच्या डाव्या हाताच्या मनगटावर खरचटल्याची खुण होती. त्याचे मोजमाप अर्धा सेमी बाय २ मीमी होते. जखम साध्या स्वरुपाची होती व ती २४ तासाच्या आंत झालेली होती. त्याने हिस्टी सांगितली होती व ती प्रमाणपत्रात नमुद केली आहे. जख्मीच्या शरीरावरील ओळखीची खूण म्हणजे उजव्या हातावर मराठीत विजय असे लिहीलेले होते. तसेच डाव्या हाताच्या करंगळीवर एक काळा तीळ होता. सदर रुग्णाची तपासणी करुन मी एमएलसी रिपोर्ट तयार केला. मला आता तो रिपोर्ट दाखविण्यात आला. हा तोच आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र.५५** देण्यात येत आहे.

**३.** मी रमेश बाबन घोगरे, हेड कॉ. वय वर्ष ५३ याला तपासले होते. तपासणीमध्ये त्याच्या डाव्या पायावर खालच्या बाजूला माराचे व्रण होते व जखम होती. त्याचे मोजमाप ५ सेमी बाय १/२ सेमी होते. जखम साध्या स्वरुपाची होती व ती टणक व कठीण वस्तूने झालेली होती. त्याने हिस्टी सांगितली होती, ती

प्रमाणपत्रात नमुद केली आहे. जख्मीच्या शरीरावरील ओळखीची खूण म्हणजे उजव्या हातावर मराठीत रमेश असे गोंदलेले लिहीलेले होते. तसेच छातीवर डाव्या बाजूला एक काळा तीळ होता. सदर रुग्णाची तपासणी करुन मी एमएलसी रिपोर्ट तयार केला. मला आता तो रिपोर्ट दाखविण्यात आला. हा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.५६** देण्यात येत आहे.

**४.** मी जगदेव गणुजी शिंदे, पोलीस वय वर्ष ५० याला तपासले होते. तपासणीमध्ये त्याच्या उजव्या बाजूच्या चेह—यावर कंटयूजन होते. त्याचे मोजमाप ५ सेमी बाय २ सेमी होते. जखम साध्या स्वरुपाची होती व २४ तासाच्या आंतील होती व ती टणक व कठीण वस्तूने झालेली होती. त्याने हिस्टी सांगितली होती, ती प्रमाणपत्रात नमुद केली आहे. जख्मीच्या शरीरावरील ओळखीची खूण म्हणजे उजव्या बाजूला चेह—यावर काळा तीळ होता. डाव्या हाताच्या दंडावर जखमेची जुनी खुण होती. सदर रुग्णाची तपासणी करुन मी एमएलसी रिपोर्ट तयार केला. मला आता तो रिपोर्ट दाखविण्यात आला. हा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.५७** देण्यात येत आहे.

**५.** मी सिताबाई सुभाष पोले, महिला पोलीस, वय वर्ष २५ हिला तपासले होते. तपासणीमध्ये आढळून आले की त्या २८ आठवडयाच्या गरोदर होत्या. त्यांना धक्का दिल्यामुळे त्या खाली पडल्या असे तिने सांगितले होते. त्यामुळे त्यांना उजव्या पायाच्या कमरेमध्ये दुखत होते. तपासणी केल्यानंतर ते नॉर्मल आढळले तरी त्यांना पुन्हा जीएमसी ला अंतर्गत काही दुखापत आहे काय हयाची तपासणीकरिता पाठविले होते. जख्मीच्या शरीरावरील ओळखीची खूण म्हणजे त्यांचे कपाळावर गोंदलेले होते. उजव्या हातावर निर्मला असे नांव गोंदलेले होते. सदर रुग्णाची तपासणी करुन मी एमएलसी रिपोर्ट तयार केला. मला आता तो रिपोर्ट दाखविण्यात आला. हा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र.५८** देण्यात येत आहे. सदर जखमा लोटलाट किंवा ओढाताण झाल्यामुळे होवू शकतातह.

सरतपास समाप्त.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री ठोकळ यांच्या मार्फत सुरु —</u>**

**६.** मी बीएएमएस एमपीएससी सिलेक्टेड आहे. मी प्राथमिक आरोग्य केंद्र पातूर येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून दिनांक ८ जून २०१७ पासून कार्यरत आहे. सदर केस एमएलसी केस आहे हे मला माहिती होते. हे म्हणणे खरे आहे

की, एमएलसी चे रेकॉर्ड ठेवले जाते. हे म्हणणे खरे आहे की, आलेल्या रुग्णाची नोंद प्रथम ओपीडी रजीस्टर मध्ये घेतली जाते. रुग्णाला आणण—या पोलीसांचा ब.नं. १०८७ असा नमूद आहे. हे म्हणणे खरे आहे की, एमएलसी निशाणी ५५ व ५६ वर पोलीसांनी ती कधी प्राप्त केली त्याची तारीख नमुद नाही. सर्व रुग्ण पोलीसांनी तपासणीकरिता एकाच वेळी आणले होते. हे म्हणणे खरे आहे की, जखमेचा रंग यावरुन जखमेचे वय ठरविले जाते. हे म्हणणे खरे आहे की, एमएलसी निशाणी ५५ ते ५८ या मध्ये जखमांचे रंग दिलेले नाही. जखमांच्या वयाबाबत डाटा दयावा लागतो असे कुठेही लिहीलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी रुग्णांना न तपासता पोलीसांच्या सांगण्यावरुन प्रमाणपत्र दिलेले आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत,

दि. ०९.०४.२०२६

सही/—

(एम.एस.भदाणे)
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, अकोला